**लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय**

जा.क्र. /प्रशासन/कलम ८१ (१)(ग),८२/परिपत्रक/२५४/२०१५
दिनांक: २२/०८/२०१५

**-: परिपत्रक :-**

या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ४४४, दिनांक ३०/०४/२०१४ अन्वये निर्गमित सूचना व निर्देशापैकी केवळ प्रस्तुत विषयांकीत कामकाज अनुषंगाने नमूद केलेल्या सूचना व निर्देश सदर परिपत्रकाव्दारे रद्द करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१)(अ) अन्वये संस्था प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील आणि जेथे संस्था ठरावाव्दारे लेखापरीक्षकाची नेमणूक करणार नाही वा संस्था तिचे लेखापरीक्षण विहित मुदतीमध्ये करवून घेणार नाही अशा स्थितीमध्ये परंतुकाखाली संस्थेच्या संबंधित निबंधकाने संस्थेच्या लेखापरीक्षणासाठी नामीकेवरील पात्र लेखापरीक्षकाची आदेशाने नेमणूक करावयाची आहे.

कायद्यातील सदर तरतुद विचारात घेता राज्यातील सर्वसाधारणत: नोंदणीकृत सर्व २ लाख ३० हजार संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण होणे अभिप्रेत असताना सन २०१४ मध्ये केवळ ४९ हजार इतक्याच संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झालेचे प्राप्त आकडेवारीवरून दिसून येते. राज्यातील सहकारी चळवळीच्या गुणात्मक वाढीसाठी, संस्थेची आर्थिक व सांपत्तीक स्थिती सभासदांच्या निदर्शनास येण्यासाठी व सहकाराची तत्वे, मुल्ये याची जोपासना होण्यासाठी सर्व सहकारी संस्थांचे १०० टक्के लेखापरीक्षण होणे अनिवार्य आहे.

सुधारित कायदा लागू होण्यापूर्वी जिल्हा निहाय सर्व संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त करवून घेणे, लेखापरीक्षण झालेल्या व न झालेल्या संस्थांची सूची ठेवणे तसेच शिल्लक संस्थांचे लेखापरीक्षण करवून घेण्यासाठी निबंधक व संस्था यांचेकडे पाठपुरावा करण्याचे काम जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग - १ हे करीत

होते. मात्र कायद्यातील बदलानंतर सदरचे काम जिल्हानिहाय जिल्हा उपनिबंधक पाहत आहेत. जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयामध्ये कर्मचारी संख्या अपुरी असणे तसेच इतर नियमीत कामकाजाची वाढीव व्याप्ती इत्यादी कारणांने जिल्हानिहाय लेखापरीक्षण अहवाल स्विकृतीपासून ते सर्व संस्थांचे लेखापरीक्षण विहित कालावधीमध्ये पूर्ण करवून घेणे व पूरक सूची अद्यावत ठेवणे या कामकाजाकडे पुरेसा वेळ देता येत नसलेने जिल्ह्यातील १०० टक्के संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करवून घेणेस मर्यादा येत आहेत. ही परिस्थिती विचारात घेता जिल्हानिहाय सदरहू कामकाज जिल्हा उपनिबंधक यांचे वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ यांनी केलेस उपलब्ध मनुष्यबळाचा सुयोग्य विनियोग होवून सर्व संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त करवून घेणे व ज्या संस्थांचे लेखापरीक्षण झालेले नाही अशा संस्थांचे परंतुकाखाली आदेश पारित करणेस्तव प्रस्ताव वेळीच संबंधित निबंधकाकडे सादर करणे सुलभ होणार आहे. परिणामी १०० टक्के संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण करता येईल. कलम ८१ (१) (ग) अन्वयेचे कामकाज निबंधकाचे वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी पाहणे प्राप्त परिस्थितीमध्ये आवश्यक आहे. या परिपत्रकान्वये जिल्हानिहाय संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ यांनी कलम ८१ (१) (ग) अन्वये निबंधकाचे वतीने अभिप्रेत कामकाज पुढीलप्रमाणे पार पाडणे बाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**I. लेखापरीक्षण अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही :**

**अ) सनदी लेखापालांच्या फर्मस्, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक, व खात्याचे लेखापरीक्षकांच्या नेमणुका -**

१) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, जिल्ह्यातील सहकारी संस्थांनी माहे ३० सप्टेंबरपर्यंत कलम ८१ (१) (अ) व कलम ७५ (२) (अ) मधील तरतुदीअन्वये वार्षिक साधारण सभेमध्ये चालू वित्तीय वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक केली अथवा नाही याची संस्थानिहाय सुनिश्चिती करील.

यामध्ये जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी नामीकेवरील अर्हता व अनुभव असणा-या लेखापरीक्षकांची अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये चालू वित्तीय वर्षासाठी केलेली नेमणूक आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीच्या आत, नेमणूक केलेल्या लेखापरीक्षकाचे नाव आणि संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षणासाठी त्याची लेखी संम्मती हे विवरणाच्या स्वरूपात संबंधित निबंधकांकडे दाखल झालेले आहे काय याची संस्थानिहाय सुनिश्चिती करावयाची आहे.

२) जिल्हानिहाय ज्या संस्थांनी अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये चालू वित्तीय वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक केलेली नाही आणि लेखापरीक्षक नेमणूकीबाबतचे विवरण दाखल करण्यात कसूर केलेली

आहे याची खात्री झालेनंतर अशा संस्थांचे परंतुकाखाली लेखापरीक्षणाचे आदेश काढण्यासाठीचे प्रस्ताव संबंधित निबंधकांकडे जिल्हा विशेष लेखापरीक्षक सादर करील.

**ब) लेखापरीक्षण कामकाजाचा आढावा -**

३) प्रत्येक सहकार वर्ष संपल्यापासून ४५ दिवसांच्या आत (१५ मे पर्यंत ) प्रत्येक संस्थेचे संचालक मंडळ संस्थेची आर्थीक पत्रके तयार करील आणि ती तयार करण्यात आल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत, उक्त संस्थेच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेने किंवा निबंधकाकडून नेमण्यात आलेल्या लेखापरीक्षकाकडे पाठविण्यात आल्याची सुनिश्चती संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक करील. (नियम ६१ )

४) ज्या संस्थांची गतवार्षिक साधारण सभेने वा परंतुकाखालील आदेशाने लेखापरीक्षकाची नेमणूक केलेली आहे, त्या संस्थांना व जिल्हा विशेष लेखापरीक्षकास लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीमध्ये प्राप्त झाला अथवा नाही याची सुनिश्चिती करावयाची आहे.

लेखापरीक्षकाने ३१ जुलै पर्यंत लेखापरीक्षण पूर्ण करावयाचे आहे व आपला लेखापरीक्षा अहवाल, लेखापरीक्षा पूर्ण झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची नोटीस देण्यापूर्वी संस्थेला आणि जिल्हा विशेष लेखापरीक्षकाला सादर करवून घेण्याची कार्यवाही जिल्हा विशेष लेखापरीक्षक संस्थानिहाय करील.

५) लेखापरीक्षकास ठरावाने व परंतुकान्वये एकूण किती संस्थाच्या वैधानिक लेखापरीक्षणाची जबाबदारी होती, त्यापैकी त्याने किती संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण केले, पैकी किती संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमित झाले, किती अहवाल प्रलंबित आहेत व लेखापरीक्षण पूर्ण व्हावयाच्या किती संस्था शिल्लक आहेत याचा कार्यकारणनिहाय, लेखापरीक्षकनिहाय आढावा जिल्हा विशेष लेखापरीक्षक घेईल.

लेखापरीक्षण पूर्ण करवून घेणे व लेखापरीक्षण अहवाल प्राप्त करवून घेण्यासाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक पाठपुरावा करील. संस्था व संस्थेने नेमलेले लेखापरीक्षक यांच्या आढावा बैठका जिल्हा विशेष लेखापरीक्षक व जिल्हा उपनिबंधक हे संयुक्तपणे घेतील.

६) लेखापरीक्षणाअंती लेखापरीक्षण अहवालासोबत लेखापरीक्षकाने सादर केलेला विनिर्दिष्ट अहवाल (Specific Report) व विशेष अहवाल (Special Report) योग्य त्या अभिप्रायासह संबंधित निबंधकास जिल्हा विशेष लेखापरीक्षक सादर करील.

७) लेखापरीक्षकांकडे आदेशाने सोपविलेले फेरलेखापरीक्षण, चाचणी लेखापरीक्षण, फिरते पथकाव्दारेचे परिक्षण व विशेष लेखापरीक्षण वेळीच पूर्ण होणेसाठी पाठपुरावा करणे, अहवाल प्राप्त करवून घेणे व ज्या कारणांसाठी निबंधकाने सदरहू परीक्षणाचे आदेश पारित केलेले होते त्या कारणास अनुसरून योग्य त्या अभिप्रायासह अशा विशिष्ट परिक्षणाचे अहवाल जिल्हा विशेष लेखापरीक्षक निबंधकास सादर करील.

८) ज्या राज्य स्तरीय व विभाग स्तरीय संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे ते जिल्हा विशेष लेखापरीक्षक वरील विषद अ. क्र. १ ते ६ अन्वये लेखापरीक्षक नेमणुक व लेखापरीक्षण कामकाजाबाबतची कार्यवाही करून पुरक माहिती, अहवाल व प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक तसेच विभागीय सहनिबंधक यांचेकडे संस्था कार्यक्षेत्रनिहाय सादर करतील.

वरील प्रमाणे विषद प्रक्रियेने जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्थांची जिल्हानिहाय सूची,कार्यरत संस्थांची सूची, विहित मुदतीत ज्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा झाली असेल अशा संस्थांची सूची, विहित मुदतीत ज्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा झाली नसेल अशा संस्थांची, त्याबद्दलच्या कारणांसह सूची ठेवील. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, संस्था व संबंधित लेखापरीक्षक यांच्याशी समन्वय साधील आणि प्रत्येक वर्षी सर्व संस्थांच्या लेख्यांची लेखापरीक्षा वेळेवर पूर्ण होत असल्याची सुनिश्‍चिती करील.

जिल्ह्यानिहाय लेखापरीक्षकांच्या नेमणुका व लेखापरीक्षण कामकाजाचा आढावा याबाबतची संस्थानिहाय मासिक माहिती सोबतचे **विवरणपत्र १(अ), २(अ) व २(ब)** यामध्ये जिल्हा विशेष लेखापरीक्षक जिल्हा उपनिबंधकास दरमहा सादर करील.

## II. दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही :

कलम ८२ अन्वये लेखापरीक्षण अहवालातील दोषांच्या दुरूस्तीची तरतुद आहे. राज्यातील एकूण संस्था संख्येच्या प्रमाणात दोष दुरूस्ती अहवाल प्राप्ती व त्यावरील पुढील कार्यवाही अल्प प्रमाणात होताना दिसून येते. लेखापरीक्षण अहवालावरील दोष पुर्तता वेळचेवेळी न झाल्याने त्याच त्या दोषांची वारंवारिता पुढील आर्थीक वर्षामध्ये कायम राहते आहे. ही बाब संस्थेच्या व सभासदांच्या आर्थीक, सामाजिक हितास बाधा पोहचवणारी आहे. पुढे जावून दोषांच्या पूनरावृत्तीमूळे याच संस्था आर्थीकदृष्ट्या कमकुवत होताना दिसून येतात. कलम ८२ अधिन लेखापरीक्षण अहवालामधील दोषांच्या दुरूस्तीवर वेळीच लक्ष देणे आवश्यक झालेले आहे. कलम ८२ अन्वये निबंधकाचे वतीने जिल्हानिहाय दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही बाबतचे अभिप्रेत कामकाज जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने पुढील प्रमाणे पार पाडणेबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**अ) दोष दुरूस्ती अहवाल स्विकृती व दोषदुरूस्ती अहवाल प्राप्तीसाठी पाठपुरावा -**

१. लेखापरीक्षा पूर्ण करवून प्राप्त लेखापरीक्षण अहवालामधील दोषांची वस्तुस्थिती सापेक्ष दुरूस्ती करून विहित 'ओ' नमुन्यामधील दोष दुरूस्ती अहवाल संबंधित सनदी लेखापाल फर्मस्, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक व खात्याच्या लेखापरीक्षकाकडे अभिप्राय नोंदविण्यासाठी संबंधित संस्थेने सादर केल्याची जिल्ह्यातील संस्थांची सुनिश्चिती जिल्हा विशेष लेखापरीक्षक करील.

संबंधित लेखापरीक्षकाने सदरहू दोष दुरूस्ती अहवालावर दुरूस्तीस पूरक यथायोग्य अभिप्राय नोंदवून हा अहवाल तीन महिन्याचे आत जिल्हा विशेष लेखापरीक्षक प्राप्त करवून घेईल व त्यामधील दुरूस्त न झालेल्या दोषांच्या यादीसह संबंधित निबंधकाकडे सादर करील.

२. दोष दुरूस्ती अहवाल तयार करून संबंधित सनदी लेखापाल फर्मस, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक व खात्याच्या लेखापरीक्षकांकडे सादर न केलेल्या संस्थांची संख्या व संस्थेने नेमलेल्या लेखापरीक्षकास प्राप्त दोष दुरूस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून जिल्हा विशेष लेखापरीक्षकाकडे सादर न केलेल्या संस्थांची संख्या व असे लेखापरीक्षक संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक आढावा व पाठपुराव्याने निष्पन्न करील. तसेच सदरहू दोष दुरूस्ती अहवाल सादर करणेबाबत संस्था व संबंधित लेखापरीक्षक यांचेकडे पाठपुरावा करील. योग्य त्या पाठपुराव्याअंती ज्या संस्था व लेखापरीक्षक उचित प्रतिसाद न देता दोष दुरूस्ती अहवाल सादर करणार नाहीत. अशा संस्था व लेखापरीक्षकांची सूची पुढील कार्यवाहीसाठी संबंधित निबंधकास जिल्हा विशेष लेखापरीक्षक सादर करील.

३. जिल्हा विशेष लेखापरीक्षकामार्फत प्राप्त दोष दुरूस्ती अहवालावर संबंधित निबंधकाने संस्थेस निर्गमित केलेल्या निर्देशाप्रमाणे संस्थेने दोषांची दुरूस्ती करून विहित कालावधीमध्ये संबंधित लेखापरीक्षकाचे अभिप्राय घेवून फेर दुरूस्ती अहवाल जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने प्राप्त करवून घ्यावयाचा आहे. तसेच निबंधकाच्या निर्देशास अनुसरून दोषांची झालेली दुरूस्ती व नादुरूस्त दोष याबाबतच्या अभिप्रायासह हा अहवाल संबंधित निबंधकास पुन:श्च सादर करावयाचा आहे.

४. संस्था लेखापरीक्षण अहवालातील दोषाची संपूर्ण दुरूस्ती करेपर्यत, संस्थेच्या दुरूस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकास आपला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची जबाबदारी असल्याने संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक संस्थेच्या संपूर्ण दोषांची दुरूस्ती होत असल्याची व संस्थेने नेमलेले सनदी लेखापाल

फर्मस्, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक व खात्याचे लेखापरीक्षक दुरूस्ती अहवालावर वेळोवेळी वस्तुनिष्ठ अभिप्राय नोंदवित असल्याची सुनिश्चिती करील.

५. लेखापरीक्षण अहवालाद्वारे उघडकीस आलेले दोष दुरूस्त करण्यात किंवा निबंधकाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे दोष दुरूस्त करण्यात संस्थेने कसून केली तर जिल्हा विशेष लेखापरीक्षक असे दोष दुरूस्त करून घेण्यासाठीच्या उपाय योजनेस्तव कलम ८७ (४) प्रमाणे प्रस्ताव संबंधित निबंधकास सादर करेल, संबंधित निबंधक अशा प्रस्तावित संस्थांचे दोष दुरूस्त करवून घेण्यासाठी उपाय योजना करेल आणि त्याच्या मते ज्याने किंवा ज्यांनी कसूर केली आहे, अशा संस्थेच्या एक किंवा अनेक अधिकाऱ्यांकडून उपाय योजनेसाठी झालेला खर्च वसुल करेल.

६. ज्या संस्था दोष दुरूस्ती अहवाल तयार करून सादर करणार नाहीत अशा संस्थांच्या सर्व समिती सदस्यांनी कलम १४६ खाली **अपराध** केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ते १४७ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे **शास्तीस** पात्र ठरण्याचे तरतुदीस पूरक संस्थानिहाय प्रस्ताव संबंधित निबंधकाकडे जिल्हा विशेष लेखापरीक्षक सादर करील. त्याप्रमाणे संबंधित निबंधक कलम १४६, १४७ व १४८ अन्वये पुढील कायदेशीर कार्यवाही पार पाडील.

७. जिल्ह्यानिहाय दोषदुरूस्ती अहवालाची स्विकृती व त्यावरील पुढील कार्यवाही याबाबतच्या कामकाजाची संस्थानिहाय मासिक माहिती सोबतचे **विवरणपत्र १(ब) व १(क)** यामध्ये जिल्हा विशेष लेखापरीक्षक जिल्हा उपनिबंधकास दरमहा सादर करील.

८. राज्यस्तरीय व विभागस्तरीय संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे ते जिल्हा विशेष लेखापरीक्षक वरील विषद अ. क्र. १ ते ६ अन्वये दोष दुरुस्ती अहवाल स्वीकृती व त्यावरील पुढील कार्यवाही करून पुरक माहिती, अहवाल व प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक तसेच विभागीय सहनिबंधक यांचेकडे संस्था कार्यक्षेत्रनिहाय सादर करतील.

तरी सदरहू परिपत्रकाअधिन निर्देशाप्रमाणे लेखापरीक्षण अहवालाची व दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व अनुषंगीक कामकाज संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने **तालुका लेखापरीक्षकांच्या** मदतीने करावयाचे आहे. जिल्हानिहाय जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक सदरहू कामकाज परस्पर समन्वयाने पार पाडतील. संबंधित सहाय्यक निबंधक व तालुका लेखापरीक्षक त्यांचे तालुक्यातील लेखापरीक्षण व दोषदुरूस्ती कामकाजाचा आढावा जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना संयुक्त स्वाक्षरीने प्रतीमाह ३ तारखेपर्यंत सादर करतील. तसेच जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक विभाग व राज्यस्तरावर लेखापरीक्षण व दोषदुरूस्ती कामकाजाचा आढावा संयुक्त स्वाक्षरीने प्रतीमाह ५ तारखेपर्यंत

परिपत्रकासोबतची अ.क्र. १(अ), १(ब), १(क) व २(अ), २(ब) अशा एकूण पाच विवरणपत्रामध्ये अचुकपणे सादर करतील. लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षक करीत असले तरी मुळ जबाबदारी निबंधकाची असल्याने सदरहू परिपत्रकाअधिन सुचनेप्रमाणे कार्यवाही करणे व करवून घेण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधकाची राहील.

**( चंद्रकांत दळवी )**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव :**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.
६. सहाय्यक निबंधक व तालुका लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव:**

१. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
२. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
४. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन, मुंबई.
५. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

१. मा.प्रधान सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई .
२. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव (सस्नेह)

**परिपत्रक : लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.**

**विवरणपत्र १(अ) लेखापरिक्षण आढावा प्रपत्र (माहे -------२०१५ अखेर)**

| अ.क्र. | विभाग / जिल्हा | अपेंडिंक्स प्रमाणे एकूण संस्था | इतर संस्था (पदूम + साखर + सूतगिरणी इ. ) | इतर संस्था वगळून एकूण संस्था (लेखापरीक्षण करावयाच्या संस्था) (३-४) | लेखापरिक्षणासाठी वाटप संस्था | | | लेखापरीक्षण पूर्ण संस्था | | | एकुण लेखापरीक्षण करावयाच्या शिल्लक संस्था (८-११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ठरावान्वये वाटप संस्था | परंतुकान्वये वाटप संस्था | एकूण वाटप संस्था | मागिल महिनाअखेर पूर्ण संस्था | चालू महिनाअखेर पूर्ण संस्था | एकूण पूर्ण संस्था | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

**परिपत्रक : लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.**

**विवरणपत्र १ (ब) : लेखापरीक्षण दोषदुरूस्ती अहवाल आढावा प्रपत्र**

| अ. क्र. | जिल्हा/विभाग | चालू आर्थिक वर्षामध्ये लेखापरीक्षण पूर्ण झालेल्या संस्थांची संख्या (विवरणपत्र १(अ) मधील रकाना क्रमांक ११) | दोष दुरूस्ती अहवाल तयार करून संबंधित लेखापरीक्षकाकडे | | संबंधित लेखापरीक्षकाने दोष दुरूस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सादर केलेल्या संस्थांची संख्या | सादर न केलेल्या संस्थांची संख्या | सादर केलेल्या संस्थांची संख्या | सादर न केलेल्या शिल्लक संस्थांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**परिपत्रक : लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.**

**विवरणपत्र १ (क) : दोषदुरूस्ती अहवालावर निबंधकाने केलेल्या कार्यवाहीचे आढावा प्रपत्र**

| अ. क्र. | जिल्हा/विभाग | चालू आर्थिक वर्षामध्ये लेखापरीक्षण पूर्ण झालेल्या संस्थांची संख्या (विवरणपत्र १(अ) मधील रकाना क्रमांक ११) | संबंधित लेखापरीक्षकाने दोष दुरूस्ती अहवालावर अभिप्राय नोंदवून निबंधकांकडे सादर केलेल्या संस्थांची संख्या (विवरणपत्र १ (ब) मधील रकाना क्रमांक ६) | संबंधित निबंधकाने कलम ८२ अन्वये दोष दुरूस्ती अहवालामधील पूर्तता न केलेल्या दोषाबाबत | | कलम ८२ अन्वयेचा दोष दुरूस्ती अहवाल संबंधित निबंधकांकडे सादर न केलेल्या संस्थांविरुद्ध केलेली कारवाई | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्देश दिलेल्या संस्थांची संख्या | निर्देश न दिलेल्या संस्थांची संख्या | कायदा कलम १४६ अंतर्गत अपराधाखाली कारवाई केलेल्या संस्थांची संख्या | कायदा कलम १४७ अंतर्गत कलम १४८ अन्वये शास्ती केलेल्या संस्थांची संख्या | दोष दुरूस्ती अहवाल अद्याप सादर केलेला नसतांनाही निबंधकाने कारवाई न केलेल्या शिल्लक संस्था संख्या | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**परिपत्रक : लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.**

**विवरणपत्र २ अ. लेखापरीक्षणाअंती सादर प्रशासकीय विशेष अहवाला वरील निबंधकांनी केलेल्या कार्यवाहीचे आढावा प्रपत्र**

| अ.क्र. | जिल्हा/ विभाग | एकूण प्राप्त प्रशासकीय विशेष अहवाल (Special Report) | | | | संबंधित निबंधकाने कार्यवाही पूर्ण केलेले विशेष अहवाल | | | कार्यवाही होणेसाठी प्रलंबित विशेष अहवाल (६-९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक दि.०१/०४/२०१५ रोजीची | चालू आर्थिक वर्षात मागील महिना अखेर | चालू महिन्यामध्ये | एकूण (३+४+५) | मागील महिना अखेर | चालू महिन्यामध्ये | एकूण (७+८) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

परिपत्रक : लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरूस्ती अहवालाची स्विकृती व सर्व संस्थांच्या लेखापरीक्षेची, दोष दुरूस्ती अहवालाची सुनिश्चिती निबंधकाच्या वतीने जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने करणेबाबत.

विवरणपत्र 2 ब. विनिर्दिष्ट अहवाल (फौजदारी कारवाईसाठी) वरील निबंधकानी केलेल्या कार्यवाहीचे आढावा प्रपत्र

| अ.क्र. | जिल्हा/ विभाग | एकूण प्राप्त विनिर्दिष्ट अहवाल (Specific Report) | | | | संबंधित लेखापरीक्षकाने प्राधिकृत पत्रान्वये विनिर्दिष्ट अहवालाअनुसार दाखल केलेले फौजदारी गुन्हे | | | कारवाई होणेसाठी प्रलंबित विशेष अहवाल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक दि. ०१/०४/२०१५ रोजीची | चालू आर्थिक वर्षात मागील महिना अखेर | चालू महिन्यामध्ये | एकूण (३+४+५) | मागील महिना अखेर | चालू महिन्यामध्ये | एकूण (७+८) | संबंधित लेखापरीक्षकांकडे | संबंधित निबंधकांकडे प्राधिकृत पत्रासाठी | एकूण (१०+११) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |